जिल्हा परिषद, बुलडाणा

(संपूर्ण स्वच्छता अभियान कक्ष)

**<u>संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा</u>**

**योजनाची वैशिष्टये:- पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. अभियान-१००८ प.क्र १७७/पापु-१६, दिनांक १५ सप्टेंबर, २००८ नुसार सदर अभियान सुरू झाले आहे. तसेच सदर अभियानासोबतच सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक १७ फेब्रुवारी, २००६ पासून दलित वस्ती विकास व सुधारणा अभियान राबविण्यात येत आहे.**

- सन २०००-०१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. घरांची, गावांची व परिसरांची स्वच्छता व्हावी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेचे आरोग्यमान व पर्यायाने जीवनमान उंचवावे व त्यायोगे **"स्वच्छतेतून समृध्दीकडे "** ही संकल्पना मूर्त स्वरूपात यावी या उद्देशाने ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत जे कार्यक्रम आखण्यात येतात त्या कार्यक्रामाची परिणामकारक अंमलबजावणी करून गावातील स्वच्छतेची परिस्थिती सुधारण्यासाठी व त्यात सातत्य राहण्यासाठी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग व सहाकार्य अपेक्षित आहे.

- **ग्रामपंचायत निवडीचे निकष:-** दिनांक २ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये अभियान राबविण्याचा ठराव करून अभियानाला सुरूवात करावयाची आहे. दरवर्षी दिनांक २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत ग्रामपंचायतींनी अंमलबजावणी अभियान सुरू करावायाचे आहे. ग्रामपंचायत क्षेत्रात सातत्याने पुढे वर्षभर राबवावयाच्या स्वच्छतेशी निगडीत बाबींची पुर्तता त्यात करावयाची आहे. पुर्तता केलेल्या बाबींची खालील तपासणी समितीद्वारे तपासणी करण्यात येते.

  १) जिल्हा परिषद मतदारसंघस्तरीय तपासणी
  २) पंचायत समितीस्तरीय तपासणी
  ३) जिल्हास्तरीय तपासणी
  ४) विभागस्तरीय तपासणी
  ५) राज्यस्तरीय तपासणी

  तपासणी समितीद्वारे खालील मुद्दयांवर तपासणी करून गुणदान देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) | पाणी व सांडपाणी व्यवस्थापन | - ३० गुण |
| २) | शौचालय व्यवस्थापन | -२५ गुण |
| ३) | घनकचरा व्यवस्थापन | -१० गुण |
| ४) | घर, गांव, परिसर स्वच्छता | -०५ गुण |
| ५) | वेयक्तिक स्वच्छता | -०५ गुण |
| ६) | कुटुंब कल्याण कार्यक्रम | - १० गुण |
| ७) | लोकसहभाग | - १० गुण |
| ८) | वैयक्तिक व सामुहिक पुढाकारातून नाविन्यपूर्ण उपकम | -०५ गुण |
| **एकूण** | | **- १०० गुण** |

तसेच सदर अभियनासोबतच  सानेगुरूजी स्वच्छ प्राथमिक शाळा व सावित्रीबाई फुले स्वच्छ अंगणवाडी स्पर्धा सुध्दा राबविण्यात येते.

- **अभियाना अंतर्गत देण्यात येणाऱ्या पारितोषिकाची माहितीः-** या अभियाना अंतर्गत अभियानाचे विविध निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना विविधस्तरावर खालील प्रमाणे पारितोषिक देण्यात येते.

| अ.क्र. | पारितोषिकाचा स्तर | पारितोषिकाची रक्कम (ग्रामपंचायत व दलित वस्ती ग्रामपंचायत) | | | प्राथमिक शाळा | अंगणवाडी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम | द्वितीय | तृतीय | | |
| १ | पंचायत समितीस्तर | २५००० | १५००० | १०००० | १०००० | ५००० |
| २ | जिल्हास्तर | ५००००० | ३००००० | २००००० | ५०००० | २५००० |
| ३ | विभागस्तर | १०००००० | ८००००० | ६००००० | १००००० | ५००००० |
| ४ | राज्यस्तर | २५००००० | २०००००० | १५००००० | ३००००० | १००००० |

- **अर्जाचा नमूनाः** स्वतंत्र अर्जाचा नमूना नसून उक्त प्रमाणे गुणदानाद्वारे ग्रामपंचायतींची पारितोषिकासाठी निवड करण्यात येते.